# मेट्रो-३च्या रुळांची बांधणी करणार लार्सन ॲण्ड टुब्रो

**मुंबई** मेट्रो-३च्या बीकेसी ते कफ परेड स्थानकांदरम्यान रुळांची बांधणी करण्याचे कंत्राट लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीला मिळाले आहे. ही कंपनी आता अप लाईन आणि डाऊन लाईन असे मिळून ४७ किलोमीटर लांबीचे रूळ बांधणार आहे. रुळांच्या या बांधणीत लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनी 'हाय ॲण्टच्युनेशन ट्विन ब्लॉक स्लीपर' या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे, असे कळते. विशेष म्हणजे हिंदुस्थानात अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा वापर प्रथमच मुंबई मेट्रो-३ प्रकल्पात करण्यात येणार आहे. यावेळी मुं.मे.रे.कॉ.चे प्रकल्प संचालक व प्रभारी व्यवस्थापकीय संचालक सुबोध गुप्ता म्हणाले, 'या प्रकल्पासाठी ट्रॅक हा एक महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो-३ मार्गिकेवर ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारती असल्याने आम्ही या प्रकल्पासाठी अत्याधुनिक ट्रॅक यंत्रणा वापरणार आहोत. या यंत्रणेमुळे कंपने व ध्वनीचा प्रभाव जाणवणार नाही आणि प्रवाशांना सुखकर प्रवासाचा अनुभव घेता येईल,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

